Publication: Punyanagari
Date: 14/1/2020
Page: 1
Column:

पुण्य नगरी

मंगळवार, १४ जानेवारी २०२०

# सांभाळून पतंग उडवा

**मुंबई :** अदानी, टाटा, महापारेषण या मुंबईतील वीज कंपन्यांनी पतंग सांभाळून उडवण्याचा सल्ला दिला आहे. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने आपल्या ३० लाख वीज ग्राहकांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा देताना पतंग उडवणाऱ्यांना उच्चदाबाच्या ओव्हरहेड वीज पारेषण तारांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे. सुरक्षिततेसाठी ओव्हरहेड वीज पारेषण तारांजवळ पतंग उडवणे जीवासाठी धोकादायक तसेच मालमत्तेचे नुकसान करणारे असल्याचे सूचित केले आहे. शिवाय पॉवर ग्रिडला हानी पोहोचल्याने संपूर्ण विभाग अंधारात जाण्याचा धोका आहे. पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा मांजा हा विजेचा सुवाहक असून केवळ या दोऱ्याचा ओव्हरहेड वाहक तारांना नुसता स्पर्श झाला तरी तो अति उच्च म्हणजेच २२ हजार व्होल्ट इतक्या विद्युत दाबाचे वहन करू शकतो. त्यामुळे वर्सोवा, ओशिवरा, गोरेगाव, मालाड, कांदिवली आणि बोरिवली येथील ओव्हरहेड वीज पारेषण तारांजवळ पतंग उडवणे टाळावे, असे अदानीकडून सांगण्यात आले आहे.